# ज्योतिर्मय

Online Journal of Literature....

साहित्याचे विद्यापीठ

❑ पुणे ❑ वर्ष १ ले ❑ अंक ३६ वा ❑ शनिवार दि.०८ मार्च २०२५ ❑ पाने ४ ❑ मूल्य : निशुल्क (खासगी वितरणासाठी)


## महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी पुणे जिल्हा तालीम संघ निवड चाचणी ८ व ९ मार्च रोजी

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**नसरापूर –** महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या मान्यतेने कर्जत–जामखेड येथे होणाऱ्या ६६ व्या राज्य अजिंक्यपद आणि प्रतिष्ठेच्या महाराष्ट्र केसरी कुस्ती स्पर्धेसाठी पुणे जिल्हा संघाच्या निवड चाचणी कुस्ती स्पर्धेचे आयोजन नसरापूर (ता.भोर) येथे करण्यात आले आहे. पुणे जिल्हा तालीम संघाच्या वतीने आणि महाराष्ट्र राज्य कुस्तीगीर परिषदेच्या संलग्नतेने ही स्पर्धा ८ आणि ९ मार्च रोजी पार पडणार आहे.

या स्पर्धेसाठी क्रीडामंत्री दत्तामामा भरणे, व पुनर्वसन मंत्री मकरंदआबा पाटील,खासदार सुनेत्रावहिनी पवार यांची उपस्थितीत राहणार असल्याची या स्पर्धेची माहिती नसरापूर येथे पत्रकार परिषदेत देण्यात आली. यावेळी पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक भालचंद्र जगताप, रुस्तम ए हिंदकेसरी व पुणे जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. अमोल बुचडे, पै. स्वप्नील कोंडे, भोर तालिम संघ अध्यक्ष प्रशांत दानवले, अभिषेक खोपडे, राजेंद्र सोनवणे, लाला कोंडे, तेजस पायगुडे, पै शंभू कोंडे , शशिकांत शिंदे, कुणाल साळुंखे उपस्थित होते.

निवड चाचणी स्पर्धा वरिष्ठ व कुमार अशा दोन गटांत पार पडणार असून एकूण ३० वजन गटांमध्ये कुस्तीगीर आपले नशीब आजमावणार आहेत .वरिष्ठ गटात मॅट आणि माती अशा दोन्ही प्रकारांत प्रत्येकी १० गट आहेत. विशेष करून महाराष्ट्र केसरी गटातील स्पर्धा ८६ किलोपासून १२५ किलो वजन गटांमध्ये होणार आहे. कुमार गटात ४१ ते ११० किलो या वजन गटांमध्ये कुस्ती लढती रंगणार आहेत. स्पर्धेतील विजेत्यांना विशेष बक्षिसे देण्यात येणार असून प्रत्येक वजन गटातील प्रथम क्रमांक मिळवणाऱ्या पैलवानाला सायकल, प्रशस्तीपत्रक आणि ट्रॉफी प्रदान केली जाईल, तर उपविजेत्याला प्रशस्तीपत्रक आणि ट्रॉफी देणार आहेत.

महाराष्ट्र केसरी गटातील अंतिम माती आणि मॅट कुस्तीतील विजेत्यामधील अंतिम फेरी घेऊन या स्पर्धेतील विजेत्याला पै. विक्रम पारखी यांच्या स्मरणार्थ ''चांदीची गदा'' आणि ''पुणे जिल्हा केसरी'' किताब देण्यात येणार आहे. तसेच, कुमार गटाच्या ११० किलो गटातील अंतिम विजेत्यास स्व.पै.अक्षय कोंडे यांच्या स्मरणार्थ ''चांदीची गदा'' आणि ''पुणे जिल्हा कुमार केसरी'' किताब प्रदान केला जाणार आहे.



स्वप्नील कोंडे मित्र परिवाराच्या वतीने आयोजित ही स्पर्धा आमदार शंकर मांडेकर, पुणे जिल्हा मध्यवर्ती बँकेचे संचालक भालचंद्र जगताप व पुणे जिल्हा तालीम संघाचे अध्यक्ष पै. अमोल बुचडे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडेल. या निवड चाचणीतून विजयी ठरलेले पैलवान कर्जत–जामखेड येथे महाराष्ट्र केसरी किताबासाठी स्पर्धेत उतरतील. त्यामुळे कुस्तीप्रेमींसाठी ही स्पर्धा अत्यंत महत्वाची आणि रोमांचक ठरणार आहे.

## विशेष लेख...

### महिलांना दिल्या जाणाऱ्या फाशीच्या निमित्ताने..

**– प्रा डॉ सुधीर अग्रवाल**

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

भारतासह कोणत्याही देशात गुन्हेगाराला मृत्युदंड देणे ही सर्वात मोठी शिक्षा मानली जाते. फाशीची सजा म्हणजे मृत्युदंड.संयुक्त अरब अमिरात मध्ये एका भारतीय मुस्लिम महिलेला नुकतीच फाशी देण्यात आली.शहजादी खान या ३३ वर्षीय भारतीय महिलेला १५ फेब्रुवारी रोजी संयुक्त अरब अमिराती () मध्ये चार महिन्यांच्या बाळाच्या हत्येच्या आरोपाखाली फाशी देण्यात आली. उत्तर प्रदेशातील बांदा जिल्ह्यातील रहिवासी असलेले खान १९ डिसेंबर २०२२ रोजी पर्यटक म्हणून अबू धाबीला गेले होते.नंतर ती एका स्थानिक जोडप्याच्या तान्ह्या मुलाची काळजीवाहू बनली ज्यांनी तिचा काळजीवाहू व्हिसाची व्यवस्था केली. शहजादीच्या फाशीच्या निमित्ताने परत एकदा महिलांना दिल्या जाणाऱ्या फाशीचा मुद्दा समोर आला आहे. पुरुषांच्या तुलनेत महिलांना फाशी होण्याचे प्रमाण कमी आहेत. सर्वसाधारणपणे, पुरुषांच्या तुलनेत महिलांसाठी मृत्युदंडाची शिक्षा आणि मृत्युदंडाची संख्या खूपच कमी आहे. महिला गुन्हेगारांना प्रत्यक्ष फाशी देणे हे खूपच दुर्मिळ आहे. महिलांसाठीचे एकमेव फाशीघर–फाशीची अंमलबजावणी करण्यासाठी देशात फक्त मथुरेच्या कारागृहातच महिलांना फाशी देण्याची सोय आहे. या कारागृहात १५० वर्षांपासून महिलांसाठी फाशीची शिक्षा द्यायची सोय करण्यात आली आहे. महिलांना फाशी देण्यासाठी मथुरा तुरुंगात १८७० मध्ये फाशी घर बनवण्यात आले होते. पण आतापर्यंत इथे एकाही महिलेला फाशी देण्यात आलेली नाही. अनेक वर्षांपासून खराब अवस्थेत पडलेल्या या फाशी घराची डागडुजी करण्यात येत आहे. स्वतंत्र भारतात महिलेला फासावर चढवण्याचा हा पहिलाच प्रसंग असेल. मथुरा कारागृहात शबनमला फाशी देण्याची तयारी सुरू आहे. भारतात आतापर्यंत किती महिलांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे? कोणत्या गुन्ह्यांसाठी न्यायालयाने महिलांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे.? स्वतंत्र भारतात आतापर्यंत फक्त दोन महिलांना मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली आहे. आता केरळच्या तिरुअनंतपुरम जिल्ह्यातील नेय्याटिंकारा न्यायालयाने २४ वर्षीय महिला ग्रीष्माला तिचा प्रियकर शेरोन राज हिच्या हत्येचा दोषी ठरवत मृत्युदंडाची शिक्षा सुनावली आहे. स्वतंत्र भारतात सर्व प्रथम १९५५ मध्ये रतनबाईंना फाशी देण्यात आली होती. तीन मुलींच्या हत्येच्या आरोपाखाली रतनबाईंना ही शिक्षा देण्यात आली.खरं तर, रतनबाईने तिन्ही मुलींचे तिच्या पतीसोबतच्या अवैध संबंधांच्या संशयावरून हत्या केली होती. त्यानंतर, न्यायालयाच्या आदेशानुसार, जानेवारी १९५५ मध्ये त्याला मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आली. याशिवाय, २००८ मध्ये मृत्युदंडाची शिक्षा सुनावण्यात आलेली शबनम ही दुसरी महिला आहे. २००८ मध्ये शबनमला तिच्या कुटुंबातील सात सदस्यांची हत्या केल्याबद्दल दोषी ठरवण्यात आले होते. शबनमने तिच्या प्रियकरासोबत मिळून ही हत्या केली होती. त्यावेळी राष्ट्रपतींनीही त्याची दया याचिका फेटाळली होती. उल्लेखनीय म्हणजे शबनम यांच्या आधी महाराष्ट्रातील दोन कुख्यात गुन्हेगार सीमा मोहन गावित आणि रेणुका किरण शिंदे यांनाही विविध न्यायालयांनी फाशीची शिक्षा सुनावली आहे. या दोन्ही बहिणी त्यांच्या आईसोबत मुले चोरायच्या. १९९० ते १९९६ दरम्यान, दोन्ही बहिणींनी पुणे, ठाणे, नाशिक आणि कोल्हापूर सारख्या शहरांमधून डझनभर मुले चोरली. जर आपण इतिहासात डोकावले तर आपल्याला आढळते की त्या दोघांनीही ५ मुलांना मारले होते. यानंतर, या दोन्ही बहिणींना फाशीपासून वाचवण्यासाठी केलेली दया याचिका देखील फेटाळण्यात आली, परंतु त्यांना अद्याप फाशी देण्यात आलेली नाही. काही कारणांमुळे त्याची फाशी पुढे ढकलली जात होती. पुढे उच्च न्यायालयाने मृत्यू दंडाची शिक्षा जन्मठेपेमध्ये परिवर्तित केली. यातील एकीचा मृत्यू झाला.शबनमला फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर, रांगेत असलेल्या त्या डझनभर महिला गुन्हेगारांनाही फाशी देण्याची प्रक्रिया सुरू होण्याची शक्यता आहे.

## जायंट्स पायोनियर्स ग्रुप तर्फे कामगार महिलांसाठी महिला दिन भव्य उपक्रमाद्वारे उत्साहात साजरा

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** जायंट्स ग्रुप पायोनियर्सच्या नेतृत्वाखालील महिला दिनानिमित्त भव्य उपक्रम पर्ल सिटी येथे पार पडला. महिला कामगारांसाठी व्यापक आरोग्य तपासणी आणि भेटवस्तू वितरण कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडला. वंश आणि प्रीत ग्रुपने प्रायोजित केलेल्या या कार्यक्रमाचे उद्दिष्ट आवश्यक आरोग्य सेवा प्रदान करणे आणि वंचित महिला कामगारांच्या कठोर परिश्रमाबद्दल कौतुक व्यक्त करणे होते.१२५ होऊन अधिक कामगारांनी या संधीचा लाभ घेतला. अश्याप्रकारे हा एक मेगा प्रोजेक्ट ठरला.

आरोग्य तपासणीमध्ये डॉ. प्राजक्ता पापुलवार यांनी सामान्य शरीर तपासणी व मार्गदर्शन, श्रीकृष्ण नेत्रालय कडून डॉ रोहित बंग यांच्या टीमने डोळ्यांची तपासणी आणि मार्गदर्शन, डॉ. अदिती पाठक यांनी दंत तपासणी आणि मार्गदर्शन आणि कुशल पॅथॉलॉजी कडून डॉ शिल्पा तोतला आणि टीमने रक्त आणि युरीन चाचण्यां केल्या.

आरोग्य जागरूकता वाढवणे, आजार लवकर ओळखणे आणि कामगारांना आवश्यक काळजी प्रदान करणे या उद्देशाने या सेवा मोफत देण्यात आल्या. वैद्यकीय तपासणी व्यतिरिक्त, या कार्यक्रमात महिलांच्या कठोर परिश्रमाची दखल घेऊन त्यांना साड्या, नाश्ता आणि मिठाई भेट देण्यात आली. या विचारशील देणग्यांचा उद्देश त्यांचा उत्साह वाढवणे आणि कृतज्ञता व्यक्त करणे हा होता.




अध्यक्षा शीतल अग्रवाल यांनी उपस्थितांचे स्वागत करून आणि उपेक्षित समुदायांच्या कल्याणासाठी अशा भव्य उपक्रमांचे महत्त्व अधोरेखित करून कार्यक्रमाची सुरुवात केली. प्रयोजक वंश आणि प्रीत ग्रुपचे प्रमुख विनोद अग्रवाल यांनी महिला दिनी समाजातील केवळ यशस्वी महिलांनाच नव्हे तर वंचित कामगार महिलांच्या प्रयत्नांचा देखील उल्लेख करण्याचे महत्त्व अधोरेखित केले.आम्ही महिला दिन उपक्रमात या महिलांना त्यांच्या अथक परिश्रम आणि समर्पणासाठी सन्मानित करण्यासाठी एक व्यासपीठ म्हणून काम करतो आहे यावर त्यांनी भर दिला.हा उपक्रम केवळ आरोग्यसेवेबद्दल नव्हता तर श्रमिक महिलांमध्ये सक्षमीकरण आणि आत्मविश्वासाची भावना निर्माण करणे, ज्यामुळे त्यांना समाजात मूल्यवान वाटेल असा अनुभव मिळावा यासाठी देखील होता.

या कार्यक्रमाला महिला कामगारांनी चांगला प्रतिसाद दिला आणि पाठिंब्याबद्दल कृतज्ञता व्यक्त केली. महिला दिन प्रकल्पाने समुदायाचे कल्याण करण्यासाठी आणि आरोग्य जागरूकता वाढवण्यासाठी महत्त्वपूर्ण योगदान दिले आहे.या कार्यक्रमाचे आयोजन जायंट्स पायोनियर्सच्या अध्यक्षा शीतल अग्रवाल, सचिव आरती सोनी, उपक्रम प्रमुख आशिमा जयस्वाल व वर्षा शाह यांनी केले होते आणि त्यांना पाठिंबा दिला होता उपाध्यक्षा पल्लवी मालाणी, सहसचिव स्वप्ना वालसेकर, पूनम अग्रवाल, पल्लवी सुराणा, श्वेता सोमाणी, नितीन मालाणि, पंकज वालसेकर यांनी. च्या महिला टीमने महिला शक्ती आणि महिला कल्याणासाठी सामूहिक प्रयत्नांवर प्रकाश टाकला आहे. अशा सकारात्मक परिणामांसह, ग्रुपचा महिला दिन समारोह भविष्यातही अशाच प्रकारच्या उपक्रमांना प्रेरणा देत राहील तसेच समाजातील सर्वात दुर्लक्षित घटकांच्या विकासासाठी झटत राहील.

## लक्षवेधी छायाचित्र....




**अस्वच्छतेची परिसीमा (स्थळ : नाथ घाट पैठण)**

(छाया : संजय व्यापारी, छत्रपती संभाजीनगर)

## प्रदीप बडदे यांना मराठी साहित्य मंडळाचा कलाभूषण पुरस्कार जाहीर

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**ठाणे –** नवी मुंबईतील कवी/लेखक/पत्रकार प्रदीप बडदे यांना नुकताच मराठी साहित्य मंडळ ठाणे यांच्या वतीने कलाभूषण पुरस्कार जाहीर झाला आहे. साहित्य उपेक्षितांचे या मासिकाचे ते कार्यकारी संपादक असून मुंबई, ठाणे, पुणे, गुजरात येथील विविध साहित्यिक मंचावर संचालक व मार्गदर्शक म्हणून कार्यरत आहेत. प्रदीप बडदे हे गेल्या वीस वर्षांपासून साहित्यक्षेत्रात कार्यरत असून त्यांना राज्यस्तरीय, जिल्हास्तरीय व राष्ट्रस्तरीय अशी ४० हून अधिक पारितोषिके व पुरस्कार प्राप्त आहेत.



रविवार, दिनांक १६ मार्च २०२५ रोजी मराठी ग्रंथ संग्रहालय, रेगे सभागृह, ठाणे येथे ज्येष्ठ साहित्यिक मा.अशोक बागवे, डॉ. विनायकराव जाधव, सिद्धार्थ कुलकर्णी, जयप्रकाश घुमटकर अशा दिग्गज मान्यवरांच्या उपस्थितीत कार्यक्रम संपन्न होणार आहे. या दिमाखदार सोहळ्याचे आयोजन मराठी साहित्य मंडळ ठाणे जिल्हा उपाध्यक्ष डॉ. राजेंद्र कवडे यांनी मोठ्या थाटात केले आहे. सूत्रसंचालन अनघा जाधव व विद्या थोरात काळे करणार आहेत.




## श्रीयश पॉलिटेक्निकमध्ये बहुविषयक शिक्षण, आनंदी शिक्षण आणि परमा प्लस मॉडेलवर अतिथी व्याख्यान

**ज्योतिर्मय 📖 साहित्य**

**छत्रपती संभाजीनगर –** श्रीयश कॉलेज ऑफ इंजिनीअरिंग अँड टेक्नॉलॉजी (पॉलिटेक्निक) अणि शिक्षा संस्कृति उत्थान्यास ह्यांच्या संयुक्त विद्यमाने ''बहुविषयक शिक्षण (राष्टीय शिक्षा धोरण २०२०), आनंदी शिक्षण आणि सेलिग्मनच्या परमा प्लस मॉडेल'' या विषयावर अतिथी व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले. श्री गुरु गोविन्द सिंह अभियांत्रिकी महाविद्यालय, नांदेड येथील प्राध्यापक डॉ. रामचंद्र मंताळकर यांनी विद्यार्थ्यांना समग्र शिक्षण, सकारात्मक मानसशास्त्र आणि यशस्वी जीवनशैली याविषयी मौल्यवान मार्गदर्शन केले.

या व्याख्यानाचे आयोजन संभाजी साठे यांनी केले होते. विद्यार्थी आणि प्राध्यापकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यांत्रिकी विभागाचे प्रमुख प्रा. एच. पी. काले यांनी आभार प्रदर्शन केले, तर श्रीयश प्रतिष्ठाणचे अध्यक्ष श्री. बसवराज मंगरूळे यांनी या यशस्वी कार्यक्रमाबद्दल सर्वांचे अभिनंदन केले.